**पाहिजेत**
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**व्यवसाय**
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का ?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६४ वा | रविवार, दि. ३१ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ४३ डिग्री तापमानात मनोज जरांगे पाटलांचे उपोषण

## मराठा आंदोलक आक्रमक, समृद्धी, सोलापूर- धुळे महामार्ग रोखला!

### मराठा आरक्षणासाठी पुन्हा संघर्षाची हाक

### डोक्यावर भगवा गमछा, बाजेवर बसून आंदोलन

**जालना (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षण व इतर मागण्यांसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील हे तळपत्या उन्हात उपोषणाला बसले आहेत. 43 अंश तापमानात शेतात एका बाजेवर संतरजी टाकून जरांगे पाटील बसले आहेत. त्यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी समाज बांधव मोठ्या संख्यने अंतरवालीत दाखल झाले आहेत. अनेक आंदोलकांनी शर्ट काढून उन्हात बसत जरांगे यांना समर्थन दर्शवले. तर महिला, लहान मुलेही या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती उन्हामुळे बिघडू लागली आहे. तसा आंदोलकांचा संयम सुटू लागला आहे. आंदोलना दरम्यान, पाठिंबा देण्यासाठी आलेल्या एका महिलेला भोवळ आल्याने तिला तातडीने ॲम्ब्युलन्सने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सकाळी दहापासून उपोषणाला सुरूवात झाली. त्यानंतर मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांना सावलीत बसण्याचे आवाहन केले. मात्र ते नाकारत जरांगे हे उन्हातच बसले.

दुपारी ऊन तापल्याने जरांगे पाटील यांना प्रचंड त्रास जाणवू लागला. उपस्थित आंदोलकांना हे सहन न झाल्याने त्यांनी थेट समृद्धी महामार्गावर काही वेळ रास्ता रोको आंदोलन केले. तर दुपारी साडेचारच्या सुमारास सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग रोखण्याचा प्रयत्न काही आंदोलकांनी केला. पोलीसांनी आंदोलकांना बाजूला करत वाहतूकीला वाट करून दिली. मराठवाड्यातील लातूर, हिंगोली जिल्ह्यामध्ये देखील मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी रास्ता रोको आणि पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करण्यात आले.

**तज्ञांना निमंत्रण, पुन्हा विखे, लाड येणार!**

दरम्यान, सकाळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांना सरकारच्या वतीने काही मसुदा देण्यात आला होता. तो मान्य असेल तर त्यासंदर्भात अध्यादेश काढण्याची तयारी सरकारने दाखवली होती. परंतु पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील मराठा आरक्षणाचे तज्ञ, अभ्यासकांना अंतरवालीत सायंकाळी पाचपर्यंत येण्याचे आवाहन जरांगे पाटील यांनी केले. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतरच आपण पुढील दिशा ठरवू असे जरांगे पाटील यांनी त्यांना सांगितले.

दरम्यान, मुंबईकडे निघालेले भाजपचे आमदार प्रसाद लाड यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतरवालीत जा, असा निरोप दिल्यामुळे ते पुन्हा छत्रपती संभाजीनगरमध्ये परतले आहेत. मनोज जरांगे पाटील यांची मराठा आरक्षण तज्ञ आणि अभ्यासकांशी चर्चा झाल्यानंतर विखे पाटील, प्रसाद लाड हे पुन्हा अंतरवाली सराटीत जाणार आहेत. त्यानंतर सरकार आणि मनोज जरांगे पाटील यांचे एकमत झाले तर उपोषण थांबवले जाऊ शकते, असे बोलले जाते. अंतरवालीमध्ये जरांगे पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी गर्दी वाढू लागली आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्य सरकारवर दबाव वाढविण्याच्या उद्देशाने हे उपोषण सुरू करण्यात आले आहे. उन्हाच्या तीव्र झळा, वाढते तापमान आणि आरोग्याच्या धोक्याची पर्वा न करता जरांगे यांनी आंदोलनाचा निर्धार कायम ठेवला आहे.

**कडक उन्हातही निर्धार कायम**

उपोषणस्थळी तापमान ४० अंशांच्या पुढे गेले असतानाही जरांगे शांतपणे बाजेवर बसून आंदोलन करत आहेत. डोक्यावर (पान 2 वर..)





**अंतरवाली सराटी पुन्हा आंदोलनाचे केंद्र**

मराठा आरक्षण चळवळीचे प्रमुख केंद्र बनलेल्या अंतरवाली सराटी गावात पुन्हा एकदा आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यभरातून मराठा बांधव, कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी येथे दाखल होत असून आंदोलनस्थळी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. मनोज जरांगे यांनी यापूर्वीही उपोषणाच्या माध्यमातून सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडले होते. मात्र अनेक आश्वासने अद्याप पूर्ण झालेली नसल्याचा आरोप करत त्यांनी पुन्हा उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

## बार्शीच्या राजेंद्र राऊतांनी घेतला अर्ज :

### भाजप उमेदवारीचा सस्पेन्स कायम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधान परिषदेच्या सोलापूर स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघासाठी शनिवारअखेर (ता. ३० मे) एकूण ५४ अर्जांची विक्री झाली आहे. त्या दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी, भाजप, काँग्रेससह इतर पक्षांच्या इच्छुकांचा समावेश आहे.



सर्वात महत्वाची घडामोड शनिवारी घडली असून भाजपचे प्रबळ इच्छूक असलेले बाशीर्चे माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी चार अर्ज घेतले आहेत. मात्र, भाजपच्या उमेदवारीचा सस्पेन्स कायम आहे.

दुसरीकडे महायुतीमधील शिवसेनेचे मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांचे चिरंजीव जीवन जानकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे, त्यामुळे पालकमंत्र्यांच्या इच्छेनुसार सोलापूरची निवडणूक बिनविरोध होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पहिल्याच दिवशी महायुतीमधील शिवसेनेकडून रमेश बारसकर यांनी तीन, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून व अपक्ष बाशीर्चे आमदार दिलीप सोपल यांचे खंदे समर्थक नागेश अक्कलकोटे यांनी तीन अर्ज घेतले होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून बाशीर्चे माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांनी ही अर्ज नेले आहेत. यातील बारसकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून महायुतीमधील बेबनाव पुढे आणला आहे.

**मोहिते पाटलांच्या भूमिकेकडे लक्ष**

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख यांनीही अर्ज घेतले आहेत. मात्र त्यांनी अद्याप उमेदवारी अर्ज भरलेला नाही, त्यामुळे या पक्षाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**राऊतांचा अर्ज नेण्याचा अर्थ काय?**


सर्वाधिक उत्सुकता असलेल्या भारतीय जनता पक्षाकडून शनिवार अखेरपर्यंत सहा उमेदवारी अर्ज घेण्यात आले आहेत. यामध्ये भाजपकडून उमेदवारीचे प्रबळ दावेदार बाशीर्चे माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी शनिवारी चार अर्ज घेतले आहेत. मात्र, पक्षाकडून अजूनही उमेदवारी जाहीर झालेली नाही, त्यामुळे भाजपच्या उमेदवारीचा सस्पेन्स कायम आहे.

**काँग्रेसची उमेदवारी कोणाला?**

महाविकास आघाडीतील जागा वाटपानुसार सोलापूरची जागा ही काँग्रेसच्या वाट्याला गेली आहे. या पक्षाचे प्रवक्ते काकासाहेब कुलकर्णी यांनी त्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती. ते स्वतः निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक आहेत. तसेच, लोकशाही जीवंत ठेवण्यासाठी सोलापूरची निवडणूक बिनविरोध होऊ देणार नसल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी म्हटलेले आहे, त्यामुळे काँग्रेसचा उमेदवार कोण असणार याची उत्सुकता आहे. विशेष म्हणजे महाविकास आघाडीत काँग्रेसकडे केवळ चार मते आहेत.

**सोलापूर विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाठी शनिवारपर्यंत घेतलेले पक्षनिहाय अर्ज**

| | | |
|---|---|---|
| १) | काँग्रेस पार्टी : | ४ |
| २) | शिवसेना (शिंदे गट) : | ५ |
| ३ | राष्ट्रवादी काँग्रेस : | १ |
| ४ | राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष : | २ |
| ५) | शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष : | ३ |
| ६) | भाजप : | ६ |
| ७) | मनसे : | १ |
| ८) | एआयएमआयएम : | १ |
| ९) | राष्ट्रीय समाज पक्ष : | १ |
| १०) | बहुजन समाज पार्टी : | १ |
| ११) | संभाजी ब्रिगेड : | १ |
| १२) | अपक्ष : | २६ |
| | एकूण अर्ज विक्री : | ५४ |



## संपादकीय

# उदंड झाला सूर्यप्रकोप

भारतामध्ये गेल्या काही वर्षांत नोंदवले गेलेले तापमान हे आजवरच्या इतिहासातील सर्वाधिक राहिले आहे. सध्याचा उन्हाळा हा उपखंडातील आधुनिक नोंदींमधील सर्वात तीव आणि प्रदीर्घ उष्णतेच्या कालखंडांपैकी एक ठरणार आहे.

मान्सून सुरू होण्यापूर्वीच्या काळात तापमान वाढणे सामान्य असले, तरी यंदा भूप्रदेशावर स्थिर राहिलेल्या 'अँटिसायक्लोन'मुळे निर्माण झालेल्या हवेच्या उच्च दाबामुळे उष्ण हवा एकाच ठिकाणी साचून राहिली. हवेची हालचाल मंदावल्याने जमीन अधिक प्रमाणात तापत चालली आहे. याशिवाय मान्सूनपूर्व पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिल्याने जमिनीतील ओलावा संपला असून कोरडे वातावरण उष्णता अधिक वाढवण्यास कारणीभूत ठरत आहे. मानवी सहनशीलतेच्या मर्यादांची कसोटी लावणारा असा उन्हाळा गेल्या 50-60 वर्षांमध्ये अनुभवास आलेला नाही. नवतपा म्हणजेच उन्हाळ्यातील सर्वाधिक नऊ उष्ण दिवस असतात. 25 मेपासून सुरू झालेला नवतपा 2 जूनपर्यंत सुरू राहणार आहे. या काळात सूर्य पृथ्वीच्या अगदी जवळ असतो. त्यामुळे तीव सूर्यप्रकाश आणि उष्ण वाऱ्यांनी टोक गाठलेले असते. उत्तर व पश्चिम भारतात या कालावधीत कमाल तापमानाचा पारा 48 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकतो. यंदाच्या वर्षी अल निनो सक्रिय झाल्यामुळे 2026 आणि 2027 ही वर्षे आजवरची सर्वात उष्ण वर्षे ठरण्याचा अंदाज असून, यातील कोणतेही एक वर्ष सर्वोच्च तापमानाचा विक्रम मोडण्याची शक्यता आहे. हवामान बदलामुळे उष्णतेच्या लाटेची तीव्रता सुमारे 2 अंश सेल्सिअसने अधिक वाढली. जगातील सर्वाधिक उष्ण 50 शहरांच्या यादीमध्ये सर्व शहरे भारतातील होती. 25 मे रोजी महाराष्ट्रातील ब्रह्मपुरीमधील तापमान 47.6 अंशांवर पोहोचले. विदर्भातील प्रमुख जिल्ह्यांमध्ये याच समकक्ष तापमान आहे. राजस्थान, दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, ओडिशा, तेलंगणा आणि महाराष्ट्राचा समावेश असलेल्या भारताच्या मुख्य उष्णता क्षेत्रामध्ये (कोअर हीटवेव्ह झोन) उष्णतेच्या लाटांचे प्रमाण आणि कालावधी वाढला आहे. काही विशिष्ट क्षेत्रांत हे तापमान सरासरीपेक्षा तब्बल 8 अंशांनी जास्त आहे. राजस्थान आणि पाकिस्तानच्या वाळवंटी भागातून येणाऱ्या उष्ण वाऱ्यामुळे ही स्थिती निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. यवतमाळ जिल्ह्यात 48 तासांत आठ जणांचा आकस्मिक मृत्यू झाला. हे सर्व उष्माघाताचे बळी असल्याचा अंदाज आहे. पशुपक्ष्यांना, गुराढोरांनाही उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहे. छत्तीसगडमधील कोरबा जिल्ह्यात भीषण उष्णतेमुळे 600 वटवाघळांचा मृत्यू झाला. तीव उष्णतेमुळे आणि पाण्याअभावामुळे पक्षी हवेतून थेट खाली कोसळत आहेत. अनेक गरूड आणि कबुतरे बेशुद्ध अवस्थेत रस्त्यांवर आढळत असून भटक्या प्राण्यांमध्ये पोटाचे विकार आणि संसर्ग वाढले आहेत. महाराष्ट्रातील शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था उष्णतेमुळे कोलमडली आहे. आंबे अकाली गळणे आणि उन्हामुळे डाग पडणे यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. टोमॅटो, मिरची, वांगी आणि कोबी या पिकांची फुले गळत असून, त्यांची गुणवत्ता खालावली आहे. उष्णतेमुळे गायी आणि म्हशींचा चारा खाण्याचा वेग मंदावल्याने दूध उत्पादनात घट झाली आहे. कुक्कुटपालन व्यवसायात कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. ओडिशा आणि तेलंगणामध्ये उष्माघातामुळे 32 हून अधिक मृत्यू झाले. 'द लॅन्सेट' आणि इतर नामांकित वैद्यकीय नियतकालिकांमधील संशोधनानुसार, भारतात केवळ थेट उष्माघाताने मरणारे लोक कमी असतात; परंतु उष्णतेच्या लाटेमुळे हृदयरोग, मधुमेह, मूत्रपिंडाचे आजार यांसारखे जुने आजार बळावून दगावणाऱ्यांची संख्या प्रचंड मोठी आहे. संयुक्त राष्ट्राच्या विविध पर्यावरण अहवालांनुसार, जागतिक स्तरावर हवामान बदलामुळे सर्वात जास्त मृत्यू घडवून आणणाऱ्या नैसर्गिक आपत्तींमध्ये 'अतिउष्णता' अग्रस्थानी आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, 2000 ते 2019 या दोन दशकांत जगात दरवर्षी सरासरी 4,89,000 लोकांचा मृत्यू उष्णतेशी संबंधित कारणांमुळे झाला. यापैकी 45 टक्के मृत्यू एकट्या आशिया खंडात झाले.

गेल्या एका दशकात भारतातील उष्ण आणि दमट दिवसांची संख्या 14,086 वरून 16,970 इतकी वाढली आहे. भारतातील सरासरी आर्द्रतेचे प्रमाण 2015-2019 या काळातील 67.1 टक्क्यांवरून वाढून 71.2 टक्के झाले आहे. रात्रीच्या सरासरी तापमानात प्रतिदशक सुमारे 0.21 अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. यंदाच्या वर्षीही अनेक शहरांमध्ये रात्रीचे तापमान 30 अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. यामुळे दिवसाच्या उष्णतेतून सावरण्यासाठी आवश्यक असणारा थंड वेळ मिळेनासा झाला आहे. शहरांमध्ये काँक्रीट रात्रभर उष्णता सोडते. यामुळे रात्रीचे तापमान सामान्यपेक्षा 5-7 अंश जास्त राहते. ग्रामीण भागातील माती आणि झाडे उष्णता परावर्तित करतात किंवा बाष्पीभवनाद्वारे वातावरण थंड ठेवतात. याउलट शहरांमधील बांधकामे ही उष्णता रात्री वातावरणात सोडू लागतात. शहरांमध्ये वाहनांची प्रचंड संख्या, कारखान्यांमधून निघणारा धूर आणि कोट्यवधी घरांमध्ये रात्रंदिवस चालणारे एसी तापमानवाढीत लक्षणीय भर घालत आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, पूर्वीच्या दशकांच्या तुलनेत सध्या पृथ्वी सुमारे 2 अंश सेल्सिअसनी अधिक तापली आहे. या तीव उष्णतेचा फटका देशातील सुमारे 4 कोटी 40 लाख लोकांना बसला असून, यामुळे सुमारे 341 अब्ज डॉलर्सच्या आर्थिक व्यवहारांवर विपरीत परिणाम झाला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, घरातील तापमान 24 अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असू नये. कारण, त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांवर ताण येतो आणि झोपेत अडथळा निर्माण होतो. त्यामुळे हा काळ आरोग्याच्या दृष्टीनेही काळजीचा आहे. या शतकाच्या शेवटापर्यंत भारतात उन्हाळ्यातील उष्णतेच्या लाटांच्या तीवतेत आणि वारंवारतेमध्ये 300 ते 400 टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची भीती आहे. म्हणजेच आज आपण ज्या सुख-सुविधांनी समृद्ध असलेल्या जीवनशैलीला यशाचे शिखर मानत आहोत, तेच वास्तव उद्याच्या पिढ्यांसाठी बिकट स्थिती निर्माण करणारे ठरणार आहे. अद्यापही वेळ गेलेली नाही. विकासामागे धावताना वृक्ष लागवड, वन क्षेत्रवाढ, निसर्ग संवर्धनाला गतिमानता आणि प्राधान्य दिल्यास उंबरठ्यावर असलेला हाहाकार टाळता येईल.

पान १ वरून

## ४३ डिग्री तापमानात मनोज जरांगे...

भगवा गमछा गुंडाळून उन्हापासून संरक्षण करण्याचा प्रयत्न केला जात असला तरी तीव्र उष्णतेमुळे त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. वैद्यकीय पथकांकडून नियमित तपासणी केली जात असून समर्थकांकडून उपोषण मागे घेण्याचे आवाहनही केले जात आहे. मात्र मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याच्या भूमिकेवर जरांगे ठाम असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले.

**मराठा समाजात पुन्हा उत्साह :** जरांगे यांच्या उपोषणामुळे राज्यातील मराठा समाजात पुन्हा एकदा चळवळीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोशल मीडियावरही आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळत असून हजारो युवक आणि समर्थकांनी पाठिंबा जाहीर केला आहे. अनेक ठिकाणी बैठका, समर्थन मोर्चे आणि निवेदने देण्याचे कार्यक्रम सुरू झाले असून सरकारने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे.

**सरकारच्या भूमिकेकडे लक्ष :** मनोज जरांगे यांच्या नव्या उपोषणामुळे राज्य सरकारसमोर पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. उपोषणाचा कालावधी वाढल्यास राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जरांगे यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्यात येत असून आंदोलनाबाबत सरकारकडून कोणती भूमिका घेतली जाते याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती. ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस

## सावधान! तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा खाने 'घातकच' परंतु खावुन थुंकणे 'महाघातक'

संपूर्ण जगातील लोकांना तंबाखू पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दुर करण्याकरीता तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.जागतिक आरोग्य संघटना डब्लुएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिमारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे १९८७ ला महामारी घोषीत करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला देण्यात आला.८ एप्रिल १९८८ ला डब्लुएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी ३१ मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो. डब्लुएचओने तंबाखू सेवनाने होणाऱ्या २५ प्रकारच्या शारीरिक बिमाऱ्या पहाता व ४० प्रकारचे कैंसर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता याला महामारी घोषित केली. डब्लुएचओच्या माहिती नुसार जगात तंबाखूने किंवा धुम्रपान केल्याने दरवर्षी ८० लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात.यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढु शकतो. कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळले होय.मानवाची जगण्याची दशा,दीशा ठरवीने हे मानवाच्या मनावर व हातामध्ये असते. परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वतःला व परिवाराला घातक सीध्द होवु शकते याला नाकारता येत नाही. तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर सारखे महाभयानक आजाराने मानुस जखडतो आणि यांचा दुषपरीणाम संपूर्ण परीवाराला भोगावा लागतो.ह्याबाबी मानवाने स्वतः समजुन घ्यायला हव्यात. कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते.सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते, जाहिराती लावते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आव्हान करते याला कोणते धोरण म्हणावे? मध्यंतरी महाराष्ट्रत दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चचेर्ला मोठे उधाण आले होते.या चचेर्चा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पुर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरीता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात. याव्यतीरीक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसनमुक्तीसाठी कार्य करतांना दीसतात.परंतु सरकार स्वतःहुन नशेली पदार्थाचे उत्पादन बंद करायला तयार नाही. कारण नशेली(मद्द,तंबाखू, खैनी, सिगारेट,बिडी, गुटखा,गांजा इत्यादी) वस्तुपासुन राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो व त्यावर सरकारचा कारभार चालतो.यावरून स्पष्ट होते की सरकार पैसा कमविण्याकरीता दुटप्पी धोरण अवलंबुन मानवाचा जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-१९ च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाउन होता



याकाळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्व प्रथम राजकीय पुढाऱ्यांची होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली.यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रूपात पैसा जमा झाला.यावरून स्पष्ट होते की पैशासाठी सरकार लोकांना व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी,तंबाखू, खैनी, गुटखा,खर्रा,गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किंवा तिपटीने लोकांनी घेतल्या परंतु नशासोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही. लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती.परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुलताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची धज्जीया उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता 3 कीलो मिटर पर्यंत लोक रांगेत उभे होते. अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही.प्रत्येकानी जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही.कोणतीही नशा असो ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्या शिवाय रहाणार नाही. याला म्हणतात"अती तिथे माती". त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे.अन्यथा जिवीत हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा,खैनी,खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही मग या वस्तूचे सेवन का करावे? कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला "छल्ली" व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. उदाहरण द्यायचे झाले तर बादाम १००० रुपए किलो यांच्या तुलनेत गुटखा ४४०० रुपए किलो, शुद्ध तुप ६०० रुपए किलो यांच्या तुलनेत तंबाखू १७०० रुपए किलो, सफरचंद १०० रुपए किलो यांच्या तुलनेत सुपारी ६०० रुपए किलो, दुध ५० रुपए लिटर यांच्या तुलनेत दारू ६०० रुपए लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किंमत नषेली वस्तू पेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत.परंतु नशा करणारे बहाद्दर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.कोव्हीड-१९ च्या महामारी पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू, गुटखा,खैनी, खर्रा,गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती.यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल. करोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दीवसेंदीवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह २८ राज्यांनी तंबाखू व धुम्रपानामुळे कोरोणाची लागन होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ञांचे म्हटले होते.या पार्श्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालने उचीत होते तीच पद्धत नेहमीसाठी सरकार कडून अमलात यायला हवी. सध्याच्या परीस्थितीत युवापिढी "धुम्रपानाच्या"आहारी जातांना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवुन धुम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धुम्रपानाचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे "मृत्यूच्या रांगेत"उभे रहाल्यासारखे आहे.याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. सरकारने कीतीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्श सुध्दा करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किंवा इतर नशेली वस्तू थुंकु नये याची काळजी घ्यायला हवी.कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक आजार व संक्रमनात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील" त्याचप्रमाणे "आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल. त्यामुळे तंबाखू खर्रा खावुन रस्त्यावर थुंकु नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देवु नका ही माझी आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे.याकरीता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपण"संकल्प"करूया की यानंतर धुम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या. सुखी संसाराला उध्वस्त करणारी तंबाकु आणि व्यसनाची मैत्री नका स्वीकारू, मूल्य जीवनाचे जाणून व्यसनाला दूर सारू,नका त्या नशेला भारु,सदा रहा सुखी संसाराचे धनी,आनंद लुटूनि परिवारजनी,करू समाजाला व देशाला व्यसन मुक्त हाच आमचा संकल्प.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# उजनी धरणात गतवर्षीच्या तुलनेत ३६ टक्के कमी पाणीसाठा; मान्सूनपूर्व पावसाची प्रतीक्षा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):** मान्सूनपूर्व पावसाने अद्याप हजेरी न लावल्याने राज्यातील महत्त्वाच्या उजनी धरणातील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर आला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा धरणात सुमारे ३६ टक्के कमी पाणीसाठा असून, २९ मे रोजी धरणाची स्थिती केवळ २०.१० टक्के इतकी नोंदविण्यात आली आहे.



गतवर्षी मे महिन्यात मान्सूनपूर्व पावसाने भीमा आणि निरा खोऱ्यात दमदार हजेरी लावली होती. त्यामुळे उजनी धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली आणि अवघ्या वीस दिवसांत धरण मृतसाठ्यातून उपयुक्त पाणी पातळीपर्यंत पोहोचू लागले होते. १ जून २०२५ रोजी उजनी धरण उपयुक्त पाणी पातळीत २४ टक्के भरले होते.

मागील वर्षी मे महिन्यात उजनी परिसरात २५५ मिलीमीटर मान्सूनपूर्व पावसाची नोंद झाली होती. निरा खोऱ्यात झालेल्या पावसामुळे भीमा नदीला मोठा प्रवाह मिळाला होता. दौंड परिसरातून उजनीकडे २५ हजार क्युसेकहून अधिक पाण्याची आवक होत असल्याने धरण वेगाने भरले होते. त्यानंतरच्या पावसाळ्यातही चांगला पाऊस झाल्याने उजनी धरण शंभर टक्के भरले होते आणि अतिरिक्त पाणी भीमा नदीत सोडावे लागले होते.

मात्र यंदा परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. मान्सूनपूर्व पावसाचा अभाव असल्याने धरणातील पाणीसाठा कमी होत चालला आहे. सध्या धरणात ५२.८९ टीएमसी पाणी शिल्लक असून, गतवर्षी याच दिवशी हा साठा ७२.४३ टीएमसी होता. त्यामुळे यंदा पाणीसाठ्यात मोठी घट झाल्याचे स्पष्ट होत आहे.

धरणातील १०.७० टीएमसी मृतसाठ्यातील पाण्याचा वापरआतापर्यंत करण्यात आला आहे. तर मागील वर्षी याच तारखेला धरणाच्या उपयुक्त पाणी पातळीत ८.७८ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध होता.

दरम्यान, यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मे महिन्यात तापमानात मोठी वाढ झाली असली तरी महिन्याच्या अखेरीसही पाऊस न झाल्याने शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाचे लक्ष आता मान्सूनकडे लागले आहे.

सध्या उजनी धरणातून मुख्य कालव्यात १,६२९ क्युसेक आणि भीमा-सीना जोडकालव्यात २०० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यात येत आहे. हे आवर्तन पुढील दोन दिवसांत बंद होण्याची शक्यता असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली आहे. पावसाचा विलंब कायम राहिल्यास आगामी काळात पाणी व्यवस्थापनाचे मोठे आव्हान निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## वात्रटिका

### युद्ध तिथे, भडका इथे

सदाच बेबनाव आणि
एकमेकांना धोका आहे...
युद्ध विराम होणार होणार
हा पुन्हा पुन्हा झोका आहे...
शांततेची बोलणी झाली पण
तोडगा न होता फिसकटली...
यांच्या भांणात तेल भडकले
आणि आर्थिक घडी विस्कटली..

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# हिप्परगा तलावात बुडून २८ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील नई जिंदगी विष्णुनगर परिसरातील २८ वर्षीय मोसिन रशीद शेख यांचा हिप्परगा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मोसिन रशीद शेख हे काही मित्रांसोबत हिप्परगा तलाव परिसरात गेले होते. यावेळी ते पाण्यात उतरले असता अचानक त्यांचा तोल गेला आणि ते खोल पाण्यात बुडाल्याची माहिती समोर येत आहे. सुरुवातीला मित्रांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र पाण्याची खोली अधिक असल्याने त्यांना बाहेर काढणे शक्य



झाले नाही.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, पोलीस आणि बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेत शोधकार्य सुरू केले. काही वेळाच्या अथक प्रयत्नानंतर मोसिन शेख यांचा मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला.

या दुर्दैवी घटनेमुळे नई जिंदगी व विष्णुनगर परिसरात शोककळा पसरली असून मोसिन शेख यांना ओळखणाऱ्या मित्रपरिवार व नातेवाईकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, संबंधित पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# NEET पेपरफुटीप्रकरणी 'कॉपोरेट आणि इंटिग्रेटेड' पॅटर्नवर त्वरित बंदी घाला - हेमंत पाटील



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य पणाला लावणाऱ्या 'नीट' (NEET) परीक्षा पेपरफुटी प्रकरणाने संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे. या प्रकरणाच्या सीबीआय तपासातून रोज धक्कादायक खुलासे समोर येत असून, या संपूर्ण गैरप्रकारामागे 'कॉर्पोरेट क्लासेस' आणि 'इंटिग्रेटेड कॉलेजेस'चे मोठे रॅकेट सक्रिय असावे, असा संशय 'भारत अगेन्स्ट करप्शन'चे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी व्यक्त केला. शिक्षण व्यवस्थेला लागलेली पेपरफुटीची कीड मुळापासून उपटून टाकण्यासाठी सरकारने या पॅटर्नवर तात्काळ बंदी आणावी, अशी आक्रमक मागणी पाटील यांनी बुधवारी केली.

सीबीआयने आतापर्यंत देशभरात ४९ ठिकाणी छापे टाकून लॅपटॉप, मोबाईल आणि अनेक महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत. दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर येथून तब्बल १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. परीक्षेपूर्वीच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या तिन्ही मुख्य विषयांच्या प्रश्नपत्रिका लीक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. यावर तीव्र चिंता व्यक्त करताना हेमंत पाटील म्हणाले, "हा केवळ पेपरफुटीचा गुन्हा नसून प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी केलेला खेळ आहे."

"आजकाल शाळा आणि महाविद्यालयांना थेट कोचिंग क्लासेस जोडून 'इंटिग्रेटेड कॉलेज' संस्कृती फोफावली आहे. याच कॉर्पोरेट आणि इंटिग्रेटेड क्लासेसमुळे पेपरफुटीचे आणि भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे. जे शिक्षक नामांकित शाळा-कॉलेजांमध्ये सरकारी किंवा संस्थात्मक मानधनावर शिकवतात, त्यांना खासगी कोचिंग क्लासेसमध्ये शिकवण्यास पूर्णपणे बंदी घातली पाहिजे," अशी आग्रही मागणी पाटील यांनी केली.

या शिक्षण सम्राटांच्या रॅकेटवर आणि कटकारस्थानावर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकारने आता केवळ चौकशीचा फार्स न करता, अत्यंत कडक कायद्यांची आणि नियमांची अंमलबजावणी करावी. सीबीआयचा तपास सुरू असला तरी मूळ व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन हेमंत पाटील यांनी केले.

# फुगेवाडी घटनेतील आरोपी आणि जबाबदार पोलिसांवर 'मोक्का' कारवाई करा - रविंद्र ओव्हाळ



**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** मागील तीन चार दिवसात पिंपरी चिंचवड मधील फुगेवाडी आणि हडपसर परिसरात विषारी गावठी दारूचे सेवन करून सुमारे १६ नागरिकांचा मृत्यू झाला आहे आणि काही उपचारासाठी रुग्णालयात दाखल आहेत. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी व्हावी आणि या घटनेस जबाबदार असणाऱ्या सर्व आरोपींवर आणि पोलीस तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर "मोक्का" अंतर्गत कारवाई करावी. तसेच या घटनेत मृत झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची तातडीची आर्थिक मदत करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड झोपडपट्टी विभाग अध्यक्ष रविंद्र ओव्हाळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे, तसे पत्र रविंद्र ओव्हाळ यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात दिले आहे. यावेळी अमोल मिसाळ, चंदू हलगी, छोटू खान, दत्ता थोरात, गणेश गायकवाड आदी उपस्थित होते.

ओव्हाळ यांनी या पत्रात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहर, पुणे शहर आणि पुणे जिल्हा ग्रामीण हद्दीत अनेक ठिकाणी हातभट्टीची दारू बेकायदेशीर विकली जाते. अनेक ठिकाणी पान टपरीवर देखील अंमली पदार्थ पोलिसांनी टाकलेल्या धाडीमध्ये सापडले आहेत. हातभट्टी दारू आणि अंमली पदार्थांच्या विळख्यामुळे येथील युवकांचे आणि लाखो कुटुंबांचे भवितव्य धोक्यात आले आहे. बेरोजगार तरुण, तरुणी या रॅकेटमध्ये अडकत आहेत. बेकायदेशीर दारू विक्री आणि अंमली पदार्थ विक्रीची ठिकाणे ज्या पोलीस स्टेशन हद्दीत सापडत आहेत. त्या ठिकाणच्या पोलीस अधिकाऱ्यांवर देखील गुन्हे दाखल करावेत आणि उद्ध्वस्त होणाऱ्या कुटुंबांना वाचवावे असे आवाहन या पत्राद्वारे रविंद्र ओव्हाळ यांनी केले आहे.

# जिल्हा न्यायालयाची दिशाभूल करून विकास लवांडे यांना अटक?

## पोलीस उपनिरीक्षक अमोल काळे यांच्याविरोधात विभागीय चौकशीची मागणी



**पुणे (कटूसत्य वृत्त):** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते विकास सदाशिव लवांडे यांना अटकपूर्व संरक्षण रद्द झाल्यानंतर करण्यात आलेल्या अटकेप्रकरणी नवे वळण आले असून वाघोली पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक अमोल काळे यांनी जिल्हा व सत्र न्यायालयाची जाणीवपूर्वक दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक काळे यांच्याविरोधात विभागीय चौकशी, खुलासा आणि न्यायालयीन कार्यवाही सुरू करण्याची मागणी पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात करण्यात आली आहे.

विकास लवांडे यांचे वकील ॲड. मिलिंद दत्तात्रय पवार यांनी दाखल केलेल्या अर्जात न्यायप्रक्रियेचा गैरवापर, न्यायदान प्रक्रियेत हस्तक्षेप आणि नागरिकांच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर आघात झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### अटकपूर्व संरक्षणानंतर घडला घटनाक्रम

अजार्नुसार, विकास लवांडे यांना सुरुवातीला जिल्हा व सत्र न्यायालयाने अटकपूर्व अंतरिम संरक्षण मंजूर केले होते. मात्र, पुढील सुनावणीदरम्यान वाघोली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अमोल काळे यांनी न्यायालयासमोर चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या माहितीवर विश्वास ठेवून न्यायालयाने यापूर्वी मंजूर केलेले अंतरिम संरक्षण रद्द केल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर लगेचच २१ मे २०२६ रोजी विकास लवांडे यांना पुणे जिल्हा न्यायालय परिसरातून अटक करण्यात आली.

### न्यायालय परिसरातच अटक; कायदेशीर प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

लवांडे यांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या अर्जात अटक प्रक्रियेवरही गंभीर आक्षेप घेण्यात आला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ अंतर्गत आवश्यक असलेली नोटीस न देता अटक करण्यात आल्याचा दावा अर्जात करण्यात आला आहे.

अर्जातील आरोपानुसार, अटकपूर्व संरक्षण रद्द होताच पोलीस अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करून लवांडे यांना न्यायालय परिसरातच ताब्यात घेतले. त्यामुळे ही कारवाई पूर्वनियोजित होती का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

### 'नजरचूक' की जाणीवपूर्वक दिशाभूल?

प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे न्यायालयात सादर करण्यात आलेल्या माहितीबाबतचा आहे. अजार्नुसार, संबंधित पोलीस अधिकाऱ्याने नंतर न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान चुकीचा गुन्हा क्रमांक नमूद झाल्याचे "नजरचुकीमुळे" घडल्याचे मान्य केले.

मात्र, विकास लवांडे यांच्या बाजूने हा युक्तिवाद फेटाळण्यात आला आहे. चुकीचा गुन्हा क्रमांक नमूद करणे ही केवळ तांत्रिक चूक नसून न्यायालयाची दिशाभूल करून अटकपूर्व संरक्षण निष्प्रभ करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न असल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.

### विभागीय चौकशीची मागणी

अर्जामध्ये पोलीस उपनिरीक्षक अमोल काळे यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. पुणे शहर पोलीस आयुक्तांमार्फत संबंधित अधिकाऱ्याविरोधात कठोर विभागीय कारवाई सुरू करावी, अशी मागणी न्यायालयाकडे करण्यात आली आहे.

यासोबतच अशा प्रकारच्या घटनांमुळे न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत होऊ शकतो, अशी गंभीर बाबही अर्जात नमूद करण्यात आली आहे. न्यायालयांची दिशाभूल करून नागरिकांविरोधात कारवाई होत असल्याची भावना निर्माण झाल्यास त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात, असेही अर्जात म्हटले आहे.

# टेंभुर्णी पोलिसांची धडक कारवाई

## दोन टिप्परसह आठ ब्रास अवैध वाळू जप्त



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या वतीने अवैध वाळू वाहतुकीविरोधात धडक कारवाई करण्यात आली असून दोन टिप्परसह आठ ब्रास वाळू असा तब्बल ६ लाख १ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून संबंधित चालक व मालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांना परिसरात काही दिवसांपासून अवैधरित्या वाळू वाहतूक सुरू असल्याची गुप्त माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार त्यांनी पोलीस पथकासह नियोजनबद्ध सापळा रचून विशेष मोहीम हाती घेतली. या मोहिमेदरम्यान दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये वाळू वाहतूक करणारे टिप्पर पकडण्यात आले.

पहिली कारवाई दिनांक १४ मे २०२६ रोजी करण्यात आली. यावेळी संदेश सुभाष भोसले (रा. टेंभुर्णी) हा त्याच्या मालकीच्या MH 12 PD 2026 या टिप्परमधून विनापरवाना चार ब्रास वाळूची वाहतूक करताना पोलिसांना आढळून आला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित टिप्पर व वाळू असा सुमारे ३ लाख ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या संदर्भात तात्काळ तहसीलदार कार्यालयास अहवाल सादर करण्यात आला होता.

त्यानंतर दुसरी कारवाई दिनांक १८ मे २०२६ रोजी करण्यात आली. यामध्ये टिप्पर चालक सचिन परमेश्वर सपताळ (रा. शिराळ) व टिप्पर मालक शिवम केशव कोल्हे (रा. टेंभुर्णी, ता. माढा) हे MH 45 BD 0453 या टिप्परमधून चार ब्रास वाळूची अवैधरित्या वाहतूक करताना पोलिसांच्या ताब्यात आले. या कारवाईतही टिप्परसह वाळू असा सुमारे ३ लाख ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दोन्ही प्रकरणांतील टिप्पर व जप्त वाळू सध्या टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे जमा करण्यात आली असून संबंधित प्रकरणी तहसीलदारांना अहवाल पाठविण्यात आला आहे. त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी शिवाजी सुभाष घाडगे (रा. अकलूज) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत आरोपी शिवम केशव कोल्हे, चालक सचिन परमेश्वर सपताळ तसेच संदेश सुभाष भोसले यांच्याकडून एकूण आठ ब्रास वाळू व दोन टिप्पर असा मिळून ६ लाख १ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार दत्तात्रय पवार हे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, सहाय्यक पोलीस अधीक्षक करमाळा उपविभाग अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी राहुल आत्राम आणि टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# वैराग पोलिसांची मोठी कारवाई

## तब्बल ८० ते ९० हजारांचा अवैध गुटखा जप्त



**वैराग (कटूसत्य वृत्त):-** वैराग पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटखा विक्री व साठवणुकीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत अंदाजे ८० ते ९० हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी अयाज मुलाणी या आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

करमाळा येथील निर्भया पथकाचे मंगेश पवार यांना वैराग परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध गुटखा साठवून ठेवण्यात आल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानंतर वैराग पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तात्काळ कारवाईची तयारी केली.

मंगेश पवार, गणेश गुठाळ तसेच वैराग पोलिसांच्या संयुक्त पथकाने संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकला. या कारवाईदरम्यान अयाज मुलाणी हा इसम अवैध गुटख्यासह पोलिसांच्या ताब्यात सापडला.

पोलिसांनी आरोपीकडून अंदाजे ८० ते ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपी व जप्त माल वैराग पोलीस ठाण्यात आणण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून या अवैध व्यवसायामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का याची चौकशी केली जात आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, पोलीस हेड कॉन्स्टेबल उमेश कंगले, पोलीस कॉन्स्टेबल श्रीमंत शिंगाडे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश चव्हाण तसेच करमाळा निर्भया पथकाचे मंगेश पवार आणि गणेश गुठाळ यांच्या पथकाने केली.

# 'कुर्बानी'तून मानवतेचा संदेश; सोलापुरात बकरी ईद साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात ईद-उल-अजहा अर्थात बकरी ईदचा सण शुक्रवारी धार्मिक उत्साह, श्रद्धा आणि बंधुभावाच्या वातावरणात मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. होटगी रोड शाही आलमगीर, रंगभवन, पांगल मैदान, जुना आदिलशाही आणि असार मैदान या प्रमुख ईदगाह मैदानांवर मुस्लिम बांधवांनी सकाळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विशेष नमाज अदा केली. नमाजनंतर सर्वांनी एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी धर्मगुरूंनी प्रेषित हजरत इब्राहिम आणि हजरत इस्माईल यांच्या त्यागाची परंपरा सांगत शांतता, बंधुता आणि मानवतेचा संदेश दिला. अल्लाहसाठी त्यागाची भावना व्यक्त करणारी कुर्बानीची प्रथा पार पाडण्यात आली.

तसेच गरजू व गरीब कुटुंबांना मांस वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. शहर काझी मुफ्ती सय्यद अमजदअली यांनी तरुणांना धर्माच्या नावावर समाजात तेढ निर्माण करणाऱ्या प्रोपोगेंड्यापासून दूर राहण्याचे आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. समाजात सलोखा आणि ऐक्य कायम राखण्यासाठी सर्व धर्मगुरूंनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, ईदनिमित्त शहर पोलिसांकडून संवेदनशील भागात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे सण शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# निकृष्ट गणवेशाला लगाम! शालेय शिक्षण विभागाची बहुस्तरीय तपासणी व्यवस्था

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागाने सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून मोफत गणवेश योजनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस अधीक्षक आणि शिक्षणाधिकाऱ्यांच्या नियंत्रण-खाली ही योजना काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.नव्या शासन निर्णयानुसार, पहिली ते आठवीच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना दोन गणवेश संच उपलब्ध करून देण्यात येतील.



शाळा व्यवस्थापन समितीमार्फत गणवेश खरेदी करताना किमान ७०:३० किंवा ८०:२० (पॉलिएस्टर : व्हिस्कोस/कॉटन) प्रमाणातील कापड वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या त्वचेला इजा होऊ नये यासाठी १०० टक्के पॉलिएस्टर कापडावर बंदी घालण्यात आली आहे.योजनेच्या अंमलबजावणीसाठी बहुस्तरीय तपासणी यंत्रणा उभारण्यात आली आहे. केंद्रप्रमुख १०० टक्के शाळा, गट शिक्षणाधिकारी किमान ३० टक्के शाळा आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) प्रत्येक तालुक्यातील किमान १० शाळांची तपासणी करतील. संशयास्पद नमुने प्रयोगशाळेत पाठवून तपासणी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून राज्यस्तरीय तपासणी पथक नेमले जातील. ते काही जिल्ह्यांना भेटी देऊन नमुने तपासतील. निकृष्ट दर्जा आढळल्यास कापड पुरवठादार आणि शाळा व्यवस्थापन समितीवर कायदेशीर कारवाई करतील.

गणवेशासाठी बचत गटांना मिळणार प्रोत्साहन..गणवेशाच्या दर्शनी भागावर समग्र शिक्षा अभियानाचा लोगो लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी सर्व पात्र विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करणे अनिवार्य आहे. गणवेशाची शिलाई स्थानिक महिला बचत गटांमार्फत करून घेण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. महिला बचत गट उपलब्ध नसतील, तर प्रमाणपत्र देऊन आजूबाजूच्या गटांकडून काम घ्यावे. बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी बचत गटांना प्रोत्साहन मिळणार आहे.


# Classified - छोटी जाहीरात

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)


## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा धनुर्धर
२) भुजबळ या जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून गेले आहेत
३) अंगावर शहारे आणणारे असे
४) भीती (हिंदीत)
५) नोकर ६) राज ठाकरे यांचा पक्ष
७) उशीर (हिंदीत)
८) कॉलनी (मराठीत)
१५) कामात मदत करणारा
१६) एक म्हण-*** तोंडी मोठा घास
१७) कपाळ १८) उष्ण
२०) पूर्वी पाणी आणण्यासाठी वापरली जायची ती चामड्याची मोठी गोण
२२) बोझा, भार
२६) खर्चात केलेली बचत २७) विधानसभेवर निवडून दिला जाणारा लोकप्रतिनिधी २९) पंधरा आणि सोळा मिळून होणारी संख्या
३१) शपथ (हिंदीत)
३२) होता जिवा म्हणून वाचला **
३३) माशाचा एक प्रकार
३५) जंगलात लागलेली आग
३८) महिना, माह
४०) बदामाप्रमाणे सुक्या मेव्यातील एक घटक

**आडवे शब्द :** १) भाजपमधून राष्ट्रवादी पक्षात आलेले राज्यातील एक ज्येष्ठ नेते
६) शिवशंकराचे एक नाव
९) रव्यापासून बनविलेला गरा १०) वर उलट लिहा
११) पृथ्वी, पातळ कालवण १२) पटकन, त्वरेने
१३) केर *** १४) एक दाक्षिणात्य राजकारणात प्रवेश केलेला अभिनेता-*** हसन १७) शिजवलेला तांदूळ १८) दुर्ग, किल्ला
१९) पाच दुणे २०) रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेले शहर
२१) बे दुणे २२) इनाम म्हणून मिळालेली जमीन २३) वखा उलट लिहा
२४) शंभर (हिंदीत) २५) जुन्या मराठी चित्रपटातील अभिनेता-रवींद्र ****
२६) हे कॅलेंडर प्रसिध्द आहे २८) सन उलट लिहा
३०) राशीचक्रातील एक रास ३२) दूध आणि केळीचे मिश्रण
३३) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** ३४) गुलाम
३५) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो ३६) सैन्याचा प्रमुख
३७) मग्न, लीन ३९) कागदाचा चर्तुथांश स्तंभ, कॉलम
४१) बुटाची दोरी ४२) प्रश्न (हिंदीत)
४३) या प्राण्याला वाळवंटातील जहाज म्हणतात

## सुडोकु - 264

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 8 | 3 | | | | | |
| 4 | 9 | | 1 | | 7 | | 3 | 2 |
| | | 3 | 2 | 8 | 4 | | | 6 |
| | 6 | | | 1 | 5 | | | 8 |
| | 8 | | 7 | 6 | 3 | | 2 | 9 |
| 3 | | 4 | | | | | | |
| | | 1 | | 7 | | | 8 | 4 |
| 6 | 4 | | | | | 2 | | 7 |
| | 2 | | 5 | | | 6 | | 3 |

# अनधिकृत बांधकामांवर महानगरपालिकेची कारवाई; चार ठिकाणचे पाडकाम पूर्ण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या वतीने शहरातील विविध भागांमध्ये सामासिक अंतर (मार्जिन), पार्किंग जागा तसेच नियमानुसार खुल्या ठेवावयाच्या जागांमध्ये करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर आज कारवाई करण्यात आली. या मोहिमेत चार ठिकाणांवरील वाढीव व अनधिकृत बांधकामांचे पाडकाम पूर्ण करण्यात आले.

भवानी पेठ येथील टी.पी. क्र. ०२, अंतिम प्लॉट क्र. ९० एच/३२ या ठिकाणी मिळकतदार रामकृष्ण मल्लिकार्जुन रंगदाळ व इतर यांच्या मालकीच्या इमारतीच्या रिअर मार्जिनमध्ये बांधण्यात आलेला जिना तसेच संडास-बाथरूमचे अनधिकृत बांधकाम हटविण्यात आले. या कारवाईसाठी संबंधित मिळकतदारांनी स्वतः ब्रेकर व मजूर उपलब्ध करून देत सहकार्य केले.

याशिवाय बालाजी नगर येथील श्रीकांत चोपडा आणि सलगरवाडी येथील सय्यद मदनी यांच्या अनधिकृत गाळ्यांवर कारवाई करण्यात आली. नेहरू नगर येथील पलवेचा तसेच विजय देशमुख नगर येथील पिरजादे यांच्या सामासिक अंतरातील वाढीव बांधकामे व बाल्कनीचे पाडकाम करण्यात आले. तसेच बोलकोटे नगर येथील अशोक तांबोळू यांच्या वाढीव बांधकामाचेही निष्कासन करण्यात आले.

सदर कारवाई आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली तर कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती यांच्या नियंत्रणा खाली पार पडली. यावेळी उप अभियंता आनंद जोशी, सहायक अभियंता इरशाद जरतार, कनिष्ठ अभियंते बसवराज बडगा, गणेश काकडे, अनिरुद्ध गदगे, दयानंद अवताडे, प्रमोद गोविंदवार, तौसीफ सय्यद, अतिक्रमण विभागाचे दीपक कुंभार तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिकेकडून शहरातील अनधिकृत बांधकामे, सामासिक अंतरातील अतिक्रमणे आणि पार्किंग जागेतील बेकायदेशीर बांधकामांविरोधातील कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# राजमाता अहिल्यादेवींचा विचारवारसा शिखर पहारीया फाउंडेशनने जपला- डॉ. शिंदे

## शिखर पहारिया फाउंडेशनतर्फे शिलाई मशीन, सायकलचे वाटप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भूक लागल्यावर जेवणं ही प्रकृती, भूक नसताना जेवणं ही विकृती, पण आपल्याकडे असलेल्या शिदोरीतील काही भाग समोरच्या गरजूला देणं ही आपली संस्कृती आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आयुष्यभर प्रजेचे हित हेच आपले अंतिम ध्येय मानले.

त्यांचा विचारवारसा शिखर पहारिया फाउंडेशनने पुढे जपला आहे, असे गौरोद्गार पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी काढले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ जयंतीनिमित्त शिखर पाहारिया फाउंडेशनच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत सायंकाळी ऐश्वर्या बँक्वेट हॉल येथे गरजू व निराधार महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी १० शिलाई मशीनचे वाटप, अनाथ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे यासाठी १० विद्यार्थ्यांना सायकलींचे वितरण करण्यात आले.

त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक विनोद मोटे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, फाउंडेशनचे धर्मराज गुंडे , तनवीर शेख, राज सलगर, कौशल शिंदे, विजयराज जमदाडे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सायकल आणि शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

डॉ. शिवाजी शिंदे पुढे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य अजरामर आहे. अहिल्यादेवींनी आयुष्यभर प्रजेचे हित हेच आपले अंतिम ध्येय मानले. स्वतःच्या आयुष्यात अनेक दुःखांचे डोंगर पेलूनही त्यांनी जनतेसाठी अन्नछत्रे, विहिरी आणि मंदिरांची उभारणी केली. आज त्यांच्याच नावाने सोलापूर विद्यापीठ ओळखले जाते, ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्या विचारांचा वारसा आजच्या तरुण पिढीपर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले. यावेळी विक्रम खेलबुडे यांनी आपल्या भाषणात शिखर पहारीया फाउंडेशनच्या कार्याचा गौरव केला.

प्रारंभी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यापूवीही या फाउंडेशनच्या वतीने मुलांचे पालकत्व स्वीकारणे, अनाथाश्रमांना मदत करणे, जनरेटरची सोय करणे आणि सुमारे ५ हजार अन्नधान्य किट्सचे वाटप करणे यांसारखे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले गेले आहेत. समाजातील वंचित व दुर्बल घटकांना शिक्षण आणि रोजगाराच्या माध्यमातून सक्षम करण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे धर्मराज गुंडे यांनी प्रस्ताविकात सांगितले.

# मान्सूनपूर्व कामांतील दिरंगाई; प्रभारी नगरअभियंता सारिका आकुलवार यांची वेतनवाढ स्थगित



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-**मान्सूनपूर्व नालेसफाई, नाल्यांचे खोलीकरण-रुंदीकरण आणि पूरनियंत्रण उपाययोजनांमध्ये झालेल्या दिरंगाईबाबत महापालिकेच्या प्रभारी नगरअभियंता सारिका आकुलवार यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आकुलवार यांची एक वार्षिक वेतनवाढ स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत.

गतवर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील पनाश अपार्टमेंट आणि मंत्री चंडक परिसरातदीर्घकाळ पावसाचे पाणी साचून राहिले होते. त्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागले होते. या पार्श्वभूमीवर यंदाच्या पावसाळ्यापूर्वी पूरनियंत्रण आणि आपत्कालीन व्यवस्थापनाची जबाबदारी नगरअभियंता कार्यालयाकडे सोपविण्यात आली होती. संबंधित भागातील नाले आणि पाणी निचरा व्यवस्थेच्या कामांसाठी निधीही उपलब्ध करून देण्यात आला होता. मात्र, नियोजित कामे वेळेत पूर्ण न झाल्याने निधी व्यपगत झाल्याचा ठपका आदेशात ठेवण्यात आला आहे.

महापालिका प्रशासनाने शहरातील पूरस्थिती टाळण्यासाठी पर्जन्यजल व्यवस्थापन आराखडा, नाले सर्वेक्षण, बेस मॅप तयार करणे, नाल्यांचे खोलीकरण-रुंदीकरण, गाळ काढणे आणि इतर आवश्यक कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. मात्र या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचे आयुक्तांनी नमूद केले आहे.

तसेच वसुंधरा महाविद्यालय, शरदचंद्र प्रशाला, संगमेश्वर महाविद्यालय परिसरातील नाले खोलीकरण आणि रुंदीकरणाच्या कामांबाबतही निर्देश देण्यात आले होते. पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांतील गाळ काढणे, आवश्यक कामांचे अंदाजपत्रक तयार करणे आणि मक्तेदार तसेच महापालिकेच्या यंत्रणेमार्फत कामे पूर्ण करण्याचे आदेशही जारी करण्यात आले होते.

दरम्यान, २६ मे रोजी महापौर, सभागृह नेते आणि नगरसेवकांनी विभागीय कार्यालय क्रमांक ५ अंतर्गत शिवदारे महाविद्यालय ते द्वारकाधीश मंदिरलगतच्या नाल्याच्या कामाची पाहणी केली असता काम सुरू नसल्याचे आढळून आले.संबंधित अहवाल वरिष्ठांकडे सादर करणे अपेक्षित असतानाही आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले.

आयुक्तांच्या आदेशानुसार, मान्सूनपूर्व कामांतील विलंबामुळे शहरात पाणी तुंबणे, घरांमध्ये पाणी शिरणे आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो. नालेसफाई व पूरनियंत्रणाची कामे अपूर्ण राहणे ही गंभीर बाब असून ती कार्यालयीन शिस्तीला बाधक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

'मान्सूनपूर्व कामांची पूर्तता न झाल्याने शहरात संभाव्य पूरस्थिती निर्माण होऊ शकते. नागरिकांना होणाऱ्या संभाव्य त्रासास नगरअभियंता सारिका आकुलवार या जबाबदार आहेत,' असे स्पष्ट करत आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी कारवाईचे आदेश जारी केले आहेत.

# तुकाराम मुंडेंचा भेसळखोरांवर बुलडोझर

## राज्यभर धडक कारवाई, आता फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे धोरण

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळखोर आणि नियमबाह्य अन्नपदार्थ उत्पादकांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) अभूतपूर्व धडक मोहीम हाती घेतली असून आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली आहे. केवळ दोन दिवसांत लाखो रुपयांचा भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचा अन्नसाठा जप्त करण्यात आला असून अनेक आस्थापनांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मुंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अन्नसुरक्षेच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेतल्याचे चित्र दिसत असून भेसळखोरांविरोधातील ही मोहीम राज्यभर चर्चेचा विषय ठरली आहे. विशेष म्हणजे यापुढे केवळ दंडात्मक कारवाई न करता थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे धोरण प्रशासनाने स्वीकारल्याने अन्नमाफियांचे धाबे दणाणले आहेत.

### राज्यभरात धडक तपासण्या

मुंबई, कोंकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या विभागांमध्ये एकाचवेळी मोठ्या प्रमाणावर तपासणी मोहीम राबविण्यात आली. पॅकबंद पिण्याचे पाणी, दूध, नूडल्स, कार्बोनेटेड वॉटर, खाद्यतेल, फरसाण, मिठाई, आईस्क्रीम, ताडी, डिंक, मसाले, खवा, पनीर, तूप, बेसन आणि बेकरी पदार्थांची तपासणी करण्यात आली.

या मोहिमेत सुमारे २८ लाख ७८ हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचा संशयित व निकृष्ट दर्जाचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. अनेक ठिकाणी उत्पादन प्रक्रिया, स्वच्छता, लेबलिंग आणि परवान्यांबाबत गंभीर त्रुटी आढळून आल्या.



### गुटखा माफियांवर मोठा प्रहार

राज्यात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याच्या विक्रीविरोधातही मोठी मोहीम राबविण्यात आली. ५३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असता ३४ ठिकाणी बेकायदेशीर विक्री सुरू असल्याचे आढळून आले.

या कारवाईदरम्यान २५ एफआयआर दाखल करण्यात आले असून ३३ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच पाच वाहने जप्त करण्यात आली असून २७ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत. एकूण २० लाख ५७ हजार रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### जळगावमध्ये कृत्रिम दूध तयार करण्याचा प्रकार उघड

जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यात गायीच्या दुधात खाद्यतेल मिसळून कृत्रिम दूध तयार केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दुधाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

### पुण्यात रसायनांनी पिकवलेले आंबे जप्त

पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे आंबे कृत्रिमरीत्या पिकवण्यासाठी इथिलीन रसायनांचा वापर होत असल्याचे तपासणीत आढळले. याप्रकरणी सुमारे २० हजार रुपयांचे आंबे जप्त करून नष्ट करण्यात आले.

### धुळ्यात १४ लाखांचे मटर बेसन जप्त

धुळे जिल्ह्यातील एका आटा मिलमध्ये अत्यंत अस्वच्छ वातावरणात मटर बेसन तयार केले जात असल्याचे उघड झाले. या ठिकाणाहून तब्बल १४ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. अन्नसुरक्षा नियमांचे गंभीर उल्लंघन झाल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

### धारावीतील नूडल्स उत्पादन केंद्रावर कारवाई

मुंबईतील धारावी परिसरात लेबलिंग नियमांचे उल्लंघन करून नूडल्सचे उत्पादन सुरू असल्याचे आढळले. उत्पादन केंद्रातून मोठ्या प्रमाणात माल जप्त करण्यात आला असून पुढील कारवाई सुरू आहे.

### नाशिकमध्ये बनावट लेबलिंगचा पर्दाफाश

नाशिक परिसरात परवाना नसताना खाद्यपदार्थांचे उत्पादन, बनावट लेबलिंग आणि निकृष्ट दर्जाचे खाद्यतेल विक्री करणाऱ्या अनेक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. संबंधितांवर कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

### पालघरमध्ये अस्वच्छ आईस्क्रीम उत्पादन

पालघर जिल्ह्यातील एका आस्थापनात अत्यंत अस्वच्छ परिस्थितीत आईस्क्रीम उत्पादन होत असल्याचे निदर्शनास आले. या ठिकाणाहून लाखो रुपयांचा साठा जप्त करण्यात आला असून उत्पादन प्रक्रिया बंद करण्यात आली आहे.

# टीईटी प्रकरणातील प्रभावित शिक्षकांना तात्काळ दिलासा द्या

## शैक्षिक महासंघाची केंद्र सरकारकडे मागणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** शिक्षक पात्रता परीक्षा (TET) प्रकरणाशी संबंधित पुनर्विलोकन याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अलीकडील निर्णयामुळे देशभरातील लाखो शिक्षकांच्या सेवाभवितव्याबाबत निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने (ABRSM) केंद्र सरकारकडे तात्काळ विधायी हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

देशातील १४ लाखांहून अधिक शिक्षकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संघटनेने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, न्यायालयाच्या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या शिक्षकांमध्ये अस्वस्थता, संभ्रम आणि मानसिक तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित शिक्षकांच्या नियुक्त्या त्या काळातील शासकीय नियम, अधिसूचना आणि सक्षम प्राधिकरणांनी विहित केलेल्या प्रक्रियेनुसार झालेल्या असून त्यांनी ग्रामीण, शहरी तसेच वंचित भागांमध्ये शिक्षणसेवा देत शिक्षण व्यवस्थेच्या बळकटीकरणात महत्त्वाचे योगदान दिले आहे.

महासंघाने सरकारसमोर मांडलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सध्याच्या कायदेशीर परिस्थितीमुळे लाखो शिक्षकांना अनेक वर्षांच्या सेवेनंतर अपूरणीय नुकसान सहन करावे लागू शकते. त्यांच्या सेवास्थितीबाबत अचानक निर्माण झालेली अनिश्चितता शाळांच्या दैनंदिन कामकाजावर तसेच एकूण शैक्षणिक वातावरणावर विपरीत परिणाम करू शकते. हा विषय मानवी आणि प्रशासकीय अशा दोन्ही दृष्टीने अत्यंत संवेदनशील असल्याने शासनाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक असल्याचे महासंघाने स्पष्ट केले आहे.

यापूर्वीही अशा स्वरूपाच्या परिस्थितींमध्ये व्यापक जनहित आणि संस्थात्मक स्थैर्य कायम राखण्यासाठी विधायी उपाययोजनांद्वारे कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यात आल्याची आठवण करून देत महासंघाने आगामी संसदेच्या पावसाळी अधिवेशनात अध्यादेश किंवा आवश्यक कायदेशीर दुरुस्ती करून प्रभावित शिक्षकांना तात्काळ दिलासा देण्याची मागणी केली आहे.

सरकार शिक्षकांच्या भावना आणि चिंतांचा संवेदनशीलतेने विचार करून न्याय्य व ठोस निर्णय घेईल, असा विश्वास व्यक्त करताना शिक्षकांनी राष्ट्रनिर्मितीत बजावलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना सेवा संरक्षण मिळणे आवश्यक असल्याचे महासंघाने म्हटले आहे. दरम्यान, वेळेत दिलासा न मिळाल्यास प्रभावित शिक्षकांना आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठी लोकशाही मार्गाने आणि शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन करण्यास बाध्य व्हावे लागू शकते, असा इशाराही महासंघाने दिला आहे. मात्र सरकारच्या सकारात्मक आणि सक्रिय हस्तक्षेपामुळे अशी परिस्थिती उद्भवणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान; तातडीने पंचनामे करून मदत द्या- प्रभाकर भैय्या देशमुख



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यासह परिसरातील अनेक गावांमध्ये 23 मे 2026 रोजी झालेल्या चक्रीवादळ व अवकाळी पावसामुळे शेतपिके, फळबागा, जनावरे तसेच नागरिकांच्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर भैय्या देशमुख यांनी निवासी जिल्हाधिकारी संतोष देशमुख यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात येणकी, कुरुल, कामती, आरबळी, शिरापूर, मोरवंची, लांबोटी यांसह मोहोळ तालुक्यातील 15 ते 20 गावांतील शेतकऱ्यांचे पिके व फळबागांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. शासनाने त्वरित पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली.

प्रभाकर देशमुख यांनी सांगितले की, गेल्या आठ महिन्यांपूर्वी आलेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या उध्वस्त झाला होता. त्यातून सावरण्याचा प्रयत्न सुरू असतानाच पुन्हा अवकाळी पाऊस आणि चक्रीवादळाने शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे. निसर्गाच्या या दुहेरी आघातामुळे शेतकरी हवालदिल झाला असून त्याला तातडीच्या मदतीची गरज आहे.

कर्जमाफीबाबत बोलताना त्यांनी सरकारवर टीका केली. "सरकारने कर्जमाफी जाहीर केली असली तरी तिची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. बँकांकडून शेतकऱ्यांना थकित कर्ज भरण्यासाठी सतत फोन येत आहेत. दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याऐवजी ज्या शेतकऱ्यांचे पाच, सात किंवा त्यापेक्षा अधिक लाखांचे कर्ज आहे, त्यांनाही किमान दोन लाख रुपयांची सरसकट कर्जमाफी लागू करायला हवी होती. शासनाने सर्व शेतकऱ्यांवर समान न्यायाने प्रेम करावे, अन्यथा अनेकांना आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घ्यावा लागेल," असे देशमुख यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

चक्रीवादळात मोहोळ तालुक्यातील लांबोटी येथील शेतकरी कुबेर बापू वाघमोडे यांची म्हैस दगावली असून त्यांच्या हॉटेलचे पत्रेही उडून मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक गावांतील गरीब नागरिकांच्या घरांवरील पत्रे उडून गेल्याने त्यांनाही आर्थिक फटका बसला आहे. या सर्वांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय आढेगाव येथील विजय राजाराम डोंगरे यांचा वीज कोसळून मृत्यू झाला होता, तर पापरी येथील शोभा डोंगरे यांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला होता. या दोन्ही कुटुंबीयांना शासनाकडून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत तातडीने मंजूर करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

चक्रीवादळामुळे अनेक ठिकाणी महावितरणचे वीज खांब व तारा कोसळल्या आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून शेतकरी व मुक्या जनावरांचे हाल होत आहेत. महावितरणने तातडीने वीजपुरवठा सुरळीत करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित मदत जमा करावी. काही दिवस प्रतीक्षा करूनही निर्णय न झाल्यास जनहित शेतकरी संघटना शेकडो शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून आंदोलन छेडेल आणि शासनाला जाब विचारेल, असा इशारा प्रभाकर भैय्या देशमुख यांनी दिला.

यावेळी जिल्हाध्यक्ष नाना मोरे, दिगंबर कावळे, विजय तळेकर, तालुकाध्यक्ष शिवाजी जाधव, युवक जिल्हा उपाध्यक्ष गणेश चवरे, मानाजी चवरे, समाधान घुले, पिंटू पवार, बिरू वाघमोडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींचे हप्ते बंद; हजारो महिलांमध्ये नाराजी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-**मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील हजारो महिलांचे मासिक हप्ते अचानक बंद झाल्याने लाभार्थींमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही काही महिलांचे पैसे थांबले आहेत, तर अनेक महिलांचे हप्ते केवायसी अपूर्ण असल्याच्या कारणावरून रोखण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे "सरकारला लाडक्या बहिणी आता नावडत्या झाल्या का?" असा सवाल लाभार्थी महिलांकडून उपस्थित केला जात आहे. योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी केवायसी पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र अनेक लाभार्थींनी ही प्रक्रिया पूर्ण न केल्याने त्यांच्या खात्यातील हप्ते थांबविण्यात आले आहेत. यामुळे महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयात चौकशीसाठी महिलांची मोठी गर्दी होत आहे. महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, केवायसी व्यतिरिक्त आधार कार्ड व बँक खात्यातील माहितीतील तफावत, कुटुंबातील सदस्य सरकारी सेवेत असणे, चारचाकी वाहनाची नोंद, उत्पन्न मर्यादा ओलांडणे, अपूर्ण कागदपत्रे किंवा पात्रतेशी संबंधित इतर त्रुटी यांमुळेही लाभ बंद होऊ शकतो.

तसेच काही लाभार्थी महिलांनी ६५ वर्षे वय पूर्ण केल्यानंतर योजनेच्या निकषांनुसार त्यांना लाभ मिळू शकत नसल्याचेही सांगितले जात आहे. दरम्यान, केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याबाबत शासनाकडून अद्याप कोणतीही स्पष्ट सूचना देण्यात आलेली नाही. त्यामुळे लाभ बंद झालेल्या महिलांमध्ये अस्वस्थता वाढली असून शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे. दररोज शेकडो महिला सात रस्ता येथील महिला व बालकल्याण अधिकारी कार्यालयात चौकशीसाठी येत आहेत. अचानक पैसे बंद झाल्याने महिलांचा संताप वाढला असून कार्यालयातील कर्मचाऱ्यांनाही मोठ्या प्रमाणात प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. अनेक महिलांना त्यांच्या हप्ते बंद होण्यामागील नेमके कारण समजत नसल्याने नाराजी वाढली आहे. काही लाभार्थींच्या नावावर कोणतीही स्पष्ट त्रुटी नसतानाही हप्ते बंद झाल्याची तक्रार करण्यात येत आहे. लाभार्थ्यांची नावे वगळण्याची प्रक्रिया मुंबई स्तरावरून झाल्याचे सांगितले जात असले तरी स्थानिक कार्यालयाकडून मिळणाऱ्या उत्तरांबाबत महिलांचे समाधान होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी लाभार्थी महिला आक्रमक होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# बार्शी तालुक्यात दुष्काळाची तीव्रता वाढली; विहिरी, नद्या-नाले कोरडे, पिके करपू लागली



**बार्शी (कटूसत्य वृत्त) :-** मे महिना संपत आला तरी पावसाने हजेरी न लावल्याने बार्शी तालुक्यात दुष्काळाची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. गतवर्षी मे महिन्याच्या अखेरीस साठवण तलाव भरून देणारा वरुणराजा यंदा अद्यापही गायब असल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. विहिरी, नद्या, नाले आणि साठवण तलाव अनेक महिन्यांपासून कोरडे पडले असून पाण्याअभावी शेतातील पिके करपू लागली आहेत.

तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर पावसाबाबत अनेक प्रश्न उभे ठाकले आहेत. अल निनोचा प्रभाव किती राहणार, पाऊस कधी येणार, किती बरसणार आणि जमिनीची तहान भागवणार का, अशा प्रश्नांनी बळीराजा चिंताग्रस्त झाला आहे. पावसाअभावी वर्षभर पाण्याचे नियोजन कसे करायचे आणि जनावरांचा सांभाळ कसा करायचा, याची चिंता ग्रामीण भागात वाढली आहे.

वाढत्या उष्णतेमुळे उपलब्ध पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत आहे. गतवर्षी काही भागांत चांगला पाऊस झाला असला तरी भूजलाचा मोठ्या प्रमाणावर झालेला उपसा आणि अपुरा जलसाठा यामुळे अनेक शेतांतील पिके सुकू लागली आहेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून चाऱ्याअभावी काही ठिकाणी वाळलेल्या पिकांमध्येच जनावरे सोडून त्यांची भूक भागवण्याचा प्रयत्न केला जात आहे.

बार्शी तालुक्यात नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोयाबीन पेरणीबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे. गतवर्षीही पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन कोलमडले होते. यंदा पावसाचा विलंब होत असल्याने खरीप हंगामाबाबत चिंता वाढली आहे.

ग्रामीण भागात सध्या गतवर्षीच्या पावसावरच पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र गावागावातील विहिरींची पाणीपातळी खालावली असून अनेक बोअरवेल उचक्या मारत आहेत. हातपंपांवरही मर्यादित पाणी उपलब्ध होत आहे. नद्या-नाले कोरडे पडल्याने काही ठिकाणी जमिनीत भेगा पडल्या आहेत.

दरम्यान, ज्या गावांमध्ये जलयुक्त शिवारसारखी जलसंधारणाची कामे झाली आहेत, त्या गावांना पहिल्या पावसानंतर काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या कामांमुळे किमान पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.

### पर्जन्यमानाच्या नोंदींबाबत प्रश्नचिन्ह

गतवर्षी तालुक्यातील अनेक मंडलांमध्ये चांगला पाऊस झाल्याची नोंद प्रशासनाकडे देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती आणि सरकारी आकडेवारी यामध्ये तफावत असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. चुकीच्या पर्जन्यमान नोंदींमुळे शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळविताना अडचणींचा सामना करावा लागल्याचे सांगितले जात असून यंदा पर्जन्यमानाची अचूक नोंद ठेवण्याची मागणी होत आहे.

# कल्याणशेट्टी विद्यालयातील विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** सन 2025-26 मध्ये घेण्यात आलेल्या 5 वी व 8 वी स्कॉलरशिप परीक्षेत सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयातील इयत्ता पाचवीतील दोन विद्यार्थी त्यात प्रतीक भोजप्पा निलंगे ( सेमी विभाग ) 300 पैकी 134 तर श्लोक मल्लिनाथ मठपती ( सेमी विभाग ) 300 पैकी 150 गुण मिळवून शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. तसेच इयत्ता आठवीतील दोन विद्यार्थी कु समृद्धी श्रीपती देवकते (मराठी माध्यम) 300 पैकी 218 व कु सिद्धी देविदास बाबर ( सेमी विभाग ) 300 पैकी 180 गुण मिळवून शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. वर्षभर स्कॉलरशिप परीक्षेसाठी घेतलेले जादा तास, विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन वेळोवेळी घेतलेल्या चाचण्या यामुळेच हे यश मिळाल्याचे तज्ञ शिक्षक दीपक गंगोडा यांनी सांगितले.

सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी अभिनंदन केले आहे.